# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/01/2024 (मंगळवार) सायंकाळ

---

## घरफोडी

पो.स्टे. रामटेक:— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावर गांधी वार्ड रामटेक येथे दिनांक २१/०१/२०२४ चे १५.१५ वा. ते १८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे —जुल्फीकार अहमद सिद्धीकी वय ३७ वर्ष रा. गांधी वार्ड रामटेक हा नागपुर येथे हजर असताना त्याचे घराजवळ राहणारा अफजरन सुभेदार याने फोन करून सांगितले कि, तुमच्या घराचा दरवाजा खुला आहे. आतमध्ये जावुन पाहीले असता आलमारी खुली दिसली. तसे फिर्यादीला सांगितले असता फिर्यादी हा नागपुरवरून रामटेकला आपले घरी येवुन पाहीले असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे लॉक तोडून आतमध्ये प्रवेश करून आलमारीचे लॉक तोडून लॉकरमध्ये ठेवलेले नगदी १,६५,०००/— रूपये कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८०, भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सपोनि स्वाती यावले यांनी भेट दिली असुन तसेच आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि स्वाती यावले मो. नं. ७५८८८८१०८१ या करीत आहे.

## जबरी चोरी

पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत मौजा पारशिवनी वार्ड क्र. ६ येथे दिनांक २२/०१/२०२४ चे ०६.१५ वा. ते ०६.३० वा. दरम्यान यातील अनोळखी आरोपीने फिर्यादीच्या घरातील फ्रिजवरील भाजी कापायचा चाकू आरोपीने घेवुन फिर्यादी नामे— अब्दुल गफार अब्दुल करीम शेख, वय ७७ वर्ष रा. मौजा पारशिवनी वार्ड क ६ यांच्या गळयाला लावुन पैसे कहा है असे म्हणुन नही दिया तो मार डालुंगा असे म्हटले असता फिर्यादी व आरोपी मध्ये झटापट झाली त्यानंतर आरोपीने फिर्यादीच्या हातावर चाकु मारून घरामधील आलमारीमधील ३०,०००/—रू. व फिर्यादीच्या हातामध्ये असलेला जिओ कंपनीचा मोबाईल जबरीने हिसकावुन घराच्या बाहेर उभा असलेल्या मोटरसायकल घेवुन पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३९४, ४५८ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी मा. आशित कांबळे सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक यांनी भेट दिली असुन तसेच आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि भताने पोस्टे पारशिवनी मो. नं. ९५५२८०४३८८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर